पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in ✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 37
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 4 JAN 2025

संदर्भ- १) दि. १०, ऑक्टोबर, २०१८ रोजीचा एकरुप परिनियम क्रमांक- ४
2) दि. १८ मार्च, २०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १.

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाचा २०वा दीक्षांत समारंभ दि. १० जानेवारी, २०२५ रोजी संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयाचे मा.संचालक/ प्रायार्च/ विभागप्रमुख व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, फक्त सुवर्णपदक आणि पीएच.डी पदवी प्राप्त स्नातक यांना पदवी प्रमाणपत्रे सदरील दीक्षांत समारंभात वितरीत करण्यात येणार आहेत.

माहे ऑक्टोबर २३ व मार्च- २०२४ मध्ये उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे संबंधीत महाविद्यालयास देण्यात येणार असून दि. १० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या एकरुप परिनियम क्र. ४ नूसार व दि. १८ मार्च, २०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १ अन्वये संलग्नित महाविद्यालयांनी प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर त्यांच्या स्तरावर उपरोक्त परिनियमानूसार विहित वेळेमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करुन विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे वितरीत करण्यात यावीत.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी :-

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
} सर्व विद्यार्थ्यांना व संबंधितांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

प्रत- मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय यांना या पत्राची प्रत देवून कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे संलग्नित महाविद्यालयाच्या संबंधीत कर्मचाऱ्यांनी दि. १० जानेवारी, २०२५ रोजी विद्यापीठातून घेवून जावे व विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे वितरीत करण्यात यावीत. विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे दि. १० जानेवारी, २०२५ रोजी दीक्षांत समारंभात मिळणार नसून विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयातून पदवी प्रमाणपत्रे मिळतील याबाबतची माहिती आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३०(२)] बुधवार, ऑक्टोबर १०, २०१८/आश्विन १८, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३५९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र.क्र.८३/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) तसेच कलम १३० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे दीक्षांत समारंभाच्या संबंधात पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक ४.**

१. **संक्षिप्त नाव.—**या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **व्याख्या.—**या परिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(१) " दीक्षांत समारंभ " याचा अर्थ, आपल्या विद्यापीठातील पात्र उमेदवारांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्याविषयक विशेषोपाधी आणि इतर पारितोषके प्रदान करण्याकरिता सर्वसाधारणपणे आयोजित केलेला विद्यापीठाचा समारंभ सोहळा, असा आहे;

(२) " पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ " याचा अर्थ, संलग्न महाविद्यालयातील अथवा संचालित महाविद्यालयातील अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पात्र विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व पारितोषके प्रदान करण्यासाठी आयोजित केलेला, संलग्न महाविद्यालयाचा अथवा संचालित महाविद्यालयाचा अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा समारंभ सोहळा, असा आहे.

३. **अनुसरावयाची कार्यपद्धती.—**(१) विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या शैक्षणिक नियामिकेमध्ये शैक्षणिक कार्यासाठीच्या वेळापत्रकाव्यतिरिक्त दीक्षांत समारंभाचे तात्पुरते दिनांक समाविष्ट करण्यात येतील.

(२) लगतच्या शैक्षणिक वर्षात दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात येईल.

(३) कुलपतीशी विचारविनिमय करून कुलगुरूकडून निश्चित केलेल्या दिनांकास दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात येईल.

(४) दीक्षांत समारंभापूर्वीच्या बैठकीमध्ये विद्यापरिषद, ज्या व्यक्ती पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींच्या नावांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करील. विद्यापरिषदेच्या शिफारशीवरून, व्यवस्थापन परिषद, अशा पात्र व्यक्तींना अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासाठी मान्यता देईल.

(५) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आणि अधिनियमाच्या तरतुदीनुसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आल्याखेरीज, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यात येणार नाही. अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी आदेशाद्वारे विहित करण्यात येतील.

(६) विद्यापीठ, अशा दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम निश्चित केल्याच्या दिनांकाच्या किमान तीस दिवस अगोदर तो अधिसूचित करील.

(७) दीक्षांत समारंभ आयोजित करण्याकरिता आदेशाव्दारे निर्गमित केलेल्या समारंभकालीन बाबी दीक्षांत समारंभात अंतर्भूत असतील.

(८) विद्यापीठास, संलग्न महाविद्यालय अथवा संचालित महाविद्यालय अथवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्यावतीने अशाप्रकारे नियत केलेल्या दिनांकास पदव्या प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ, पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्याचे काम नेमून देण्याचा अधिकार असेल :

परंतु, असा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ, विद्यापीठाने आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिन्याच्या आत, संलग्न महाविद्यालयाकडून अथवा संचालित महाविद्यालयाकडून अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून, आयोजित करण्यात येईल.

(९) अशा संलग्न महाविद्यालयांनी अथवा संचालित महाविद्यालयांनी अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थांनी, विद्यापीठाच्या निदेशांचे पालन करणे आणि निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करणे आवश्यक असेल.

(१०) विद्यापीठ, दीक्षांत समारंभ आयोजित केल्यानंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत, वरील तरतुदींचे पालन करून, विद्यापीठ अनुदान आयोगाकडे वार्षिक अहवाल सादर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**

शासनाचे सहसचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th October 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. Parini. 2018/C.R.83/Vishi-2.—In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with section 130 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the following uniform Statute relating to convocation, namely :—

### UNIFORM STATUTE No. 4 OF 2018.

1. *Short title.*—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Convocation) Uniform Statute, 2018.

2. *Definitions.*—In this Statute, unless the context otherwise requires :—

(1) "Convocation" means a ceremonial assembly of a University, normally held for conferring degrees, diplomas, certificates, academic distinctions and other awards to its eligible candidates;

(2) "Graduation Ceremony" means ceremonial assembly of an affiliated college or recognised institution held for conferment of degrees, diplomas, certificates and other awards to its eligible students.

3. *Procedure to be Followed.*—(1) academic calendar published by the University, in addition to the schedules for academic activities, the tentative dates for convocation shall be included.

(2) The convocation shall be held within 120 days from the date of declaration of results of examinations.

(3) Convocation shall be held on the dates to be fixed by the Vice-Chancellor in consultation with the Chancellor.

(4) In the meeting preceeding to the convocation, the Academic Council shall recommend to the Management Council, the names of persons who are eligible for award of degrees, diplomas, certificates and academic distinctions. Upon recommendation of the Academic Council, the Management Council shall accord approval to confer such degrees, diplomas, certificates and academic distinctions upon such eligible persons.

(5) No degree, diploma, certificate and academic distinction shall be conferred unless the same has been specified by the University Grants Commission and instituted by the University in accordance with the provisions of the Act. Such degrees, diplomas, certificates and academic distinctions shall be prescribed by the Ordinance.

(6) The University shall notify a programme for convocation at least thirty days before the date so fixed.

(7) Convocation shall include the ceremonial aspects, as per the provisions made for them in the Ordinances.

(8) The University shall have the power to assign affiliated colleges or recognised institutions to hold graduation ceremony for their students on its behalf, on the date so fixed, for the purpose of distribution of degrees :

Provided that such graduation ceremony shall be held by the affiliated colleges or recognised institution within one month after the convocation is held by the University.

(9) Such affiliated colleges or recognised institutions shall be required to abide by the directions of the University and hold the graduation ceremonies as per the schedule fixed.

(10) The University shall furnish an annual report to the University Grants Commission on the observance of the above provisions, within forty-five days after the convocation is held.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SIDHHARTH KHARAT,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.